पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र ०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

**प्रेस नोट**

दिनांक :– ०९/०३/२०२२

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपी जेरबंद २.४५ लाखाचा मुददेमाल जप्त.

मा. पोलीस अधिक्षक सो श्री.बच्चन सिंह यांनी वाशिम जिल्हयातील घडणा–या चोरी ,जबरी चोरी,दरोडे या घटनेवर आळा घालण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच सराईत गुन्हेगारवर नियंत्रण ठेवण्याकरीता वाशिम जिल्हयात नव्यानेच क्रिप्स हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

दिनांक २७/०२/२०२२ रोजी पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे फिर्यादी यश अनिल सरकटे रा.वाशिम यांनी फिर्याद दिली की,अज्ञात इसमाने त्याला फोन करून फोटो शुट करण्याकरीता जावयाचे आहे असे सांगुन फिर्यादीस त्यांचे मोटर सायकल वर बसवुन रेल्वे स्टेशन परिसरात घेवुन गेले व त्या ठिकाणी फिर्यादीचे डोळयात चटणी पावडर फेकुन मारहाण करून फिर्यादीचा १,७५,००००/–रू चा डिजीटल फोटो कॅमेरा व एक मोबाईल किंमत अंदाजे २०,०००/– रू चा असा एकुण १,९५,००००/– रू चा मुददेमाल जबरीने चोरून नेला अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे वाशिम शहर ला अप.क्र.१४९/२०२२ कलम ३९४ भादंवि दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयातील आरोपीचा शोधाशोध चालु असतांना मिळालेल्या गोपनीय माहीती वरून स्थानिक गुन्हे शाखेतील एक पथक तयार करून अकोला येथुन एक विधी संघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेवुन गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्याने त्यांचे दोन साथीदारा सह वाशिम येथे येवुन सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्याच प्रमाणे विधी संघर्षग्रस्त बालकाच्या सांगण्यावरून डोणगांव जि.बुलढाणा येथुन दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन त्यांनी चोरून नेलेला मुददेमाल एक कॅमेरा व एक मोबाईल व गुन्हयात वापरलेली मोटर सायकल असा एकुण २,४५,००००/– रू चा मुददेमाल जप्त करून ताब्यात घेतला. सदरच्या विधी संघर्षग्रस्त बालकांना पोस्टे वाशिम शहर यांच्या ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोस्टे वाशिम शहर करीत आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री बच्चनसिंह साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री.भामरे साहेब, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक,श्री सोमनाथ जाधव स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे पथकातील सपोनि विजय जाधव,पोहेकॉ सुनिल पवार,पोना अमोल इंगोले,राजेश राठोड,अश्वीन जाधव,सायबर सेल येथील पोकॉ प्रशांत चौधरी,गोपाल चौधरी यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम

CS Scanned with CamScanner